# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०९/२०२५ ( गुरूवार )**

---

## कोंढाळी पोलीस स्टेशन अंतर्गत चाकडोह शिवार येथील सोलार एक्सप्लोसिव्ह कंपनी येथे झालेल्या स्पोटाबाबत

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक ०४/०९/२०२५ रोजी कोंढाळी पोलीसांना माहीती मिळाली मौजा चाकडोह शिवार बाजागाव येथील सोलार एक्सप्लोसिव्ह ,या कंपनीमध्ये स्पोट झाला आहे. अशी माहीती प्राप्त होताच कोंढाळी पोलीस तात्कळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी तेथील सेक्युरीटी ऑफिसर यांनी दिलेल्या माहिती नुसार कंपनीच्या आतमधील टेकडीवरील क्रीस्टल बिल्डींग येथे सुरवातीला आग लागली व सायरन वाजला त्यामुळे तेथील कामगार बाहेर निघाले. त्यानंतर काही वेळातच सदर बिल्डींग चा स्फोट होवुन बिल्डींग जमीनदोस्त झाली. सदर घटनेत एकाचा मृत्यु झाला असुन ११ गंभीर जखमी आणि २९ किरकोळ जखमी आहे. सदर प्रकरणात पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. आज रोजी सदर प्रकरणात आज रोजी कोंढाळी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद केला आहे.

सदर घटनास्थळी मा.श्री संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परीक्षेत्र, मा.श्री. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी ,नागपुर ,मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी,काटोल, श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री राजकुमार त्रिपाठी, प्रभारी अधिकारी कोंढाळी, यांनी भेट देवुन घटनास्थळाची पाहणी केली. Petroleum and Explosive Safety Organisation

(PESO) आणि Directorate of Industrial Safety and Health (DISH) चे अधिकारी, यांनी घटनास्थळाला भेट दिली आहे.

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता मौदा आणि कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत काढण्यात आला रूट मार्च

आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद–ए–मिलाद या सणोत्सवाचा बंदोबस्त असल्याने मौदा आणि कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक ०४/०९/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या उपस्थितीत रूट मार्च घेण्यात आला.

**पोलीस स्टशन मौदा** :– नमुद रूट मार्च पोलीस स्टेशन मौदा ते जयस्तंभ चौक ते गरदेव चौक, ते पावनदौडा रोड, ते शिवाजी चौक ते परत पोलीस स्टेशन पर्यंत या मार्गाने घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा, यांच्यासह पोलीस स्टेशन मौदा येथील अधिकारी अंमलदार से यांच्यासह १ एस. आर. पी. एफ. पथक, पोलीस मुख्यालय अंमलदार , ३५ गृहरक्षक असे उपस्थित होते.

**पोलीस स्टशन कन्हान** :– नमुद पोलीस स्टेशन कन्हान ते डॉ. बाबा साहेब आंबेडकर चौक ते तारसा चौक ते नाका नं. ७ ते तारसा चौक ते गहुहुवरा चौक डॉ. बाबा साहेब आंबेडकर चौक , मच्छी मार्केट चौक, जुना पोलीस स्टेशन ते परत पोलीस स्टेशन कन्हान या मार्गाने घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे , प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान, यांच्यासह पोलीस स्टेशन कन्हान येथील अधिकारी अंमलदार तसेच १ एस. आर. पी. एफ. पथक, पोलीस मुख्यालय अंमलदार , २७ गृहरक्षक असे उपस्थित होते.







## खुन करणाऱ्या आरोपीला अवघ्या ५ तासात अटक
## रामटेक पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** पोलीस स्टेशन रामटेक येथे दिनांक ०३/०९/२०२५ रोजी चे २०/३० वा चे २१/०० वाजेच्या दरम्यान **मृतक नामे भाउराव गोविंदा मांढरे, वय ७८ वर्ष,रा. पिडंकापार ता.रामटेक जि. नागपूर** यांना त्यांच्या राहत्या घरी ते बाजेवर झोपले असता कोणीतरी चाकुने वार करून त्यांचा खुन केल्याची घटना उघडकीस आली. सदर घटनेचे गांर्भीय लक्षात घेता रामटेक पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी तात्काळ तपास सुरू केला. तपास पथकांनी आरोपीचा कसुन शोध घेतला असता गुप्तबातमीदार व शास्त्रोक्त पध्दातीने तपास करून पोलीसांनी अवघ्या ५ तासात सदर प्रकरणात मृतकाचा मुलगा **आरोपी नामे रविन्द्र उर्फ रवी भाउराव मांढरे, वय ३३ वर्ष, रा. पिडकापार ता.रामटेक** यानेच खुन केल्याचे निष्पन्न केले. मृतक हा आरोपीला दारू पिण्यासाठी व कामधंदे करण्यासाठी टोकत होता तसेच नेहमी बोलत होता याचा राग आल्याने आरोपीने मृतकास चाकुने वार करून जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी मृतकाची पत्नी फिर्यादी नामे श्रीमती मैनाबाई भाउराव मांढरे, वय ६८ वर्ष, रा.पिडकापार ता. रामटेक जि. नागपूर यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे खुनाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला रामटेक पोलीसांनी अटक केली असुन मा. न्यायालयाने आरोपीला दिनांक ०९/०९/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे.

## मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघड
## बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** पोलीस स्टेशन अंतर्गत दिनांक १७/०८/२०२५ रोजी रात्री दरम्यान यातील फिर्यादी नामे संकेत ज्ञानेश्वर राऊत, वय २६ वर्ष, रा. नागापूर हा आपली नवीन टि.व्ही.एस. रायडर मोटर सायकलने नागपूर वर्धा रोडने जात असताना टेकटाऊन सिटी वर्धा रोड जवळ लघवी करण्यासाठी थांबला असता त्याने आपली मोटर सायकल सर्व्हिस रोडचे बाजूला उभी करून ठेवली त्यावेळी चावी मोटर सायकलाच होती. कोणीतरी अज्ञात इसमाने यातील फिर्यादी हा लघवीला गेल्याचे पाहून नवीन टी.व्ही एस रायडर मोटर सायकल ही. चालू करून मोटार सायकल चोरून नेले आहे. असा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. बुटीबोरी येथे अप.क. ७७२/२०२५ कलम ३०३(२) भा. न्या.स अन्वये गुन्हा नोंद आहे.

श्री दिपक अग्रवाल, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर आणि श्री प्रतापराव भोसले, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन बुटटीबोरी यांनी नमुद गुन्हा उघडकीस आणण्यासाठी गुन्हे प्रगटीकरण शाखा पो.स्टे बोरी चे अधिकारी व अमलदार यांचे पथक गठीत करण्यात केले. नमुद पथकाने विश्वसनीय मुखबिरद्वारा कडून माहिती घेतली असता आरोपी हा कळमेश्वर हददीतील उपरवाही येथील असल्याची माहीती प्राप्त झाली. नमुद पथकाने दिनांक ०३/०९/२०२५ रोजी कळमेश्वर येथे जावून आरोपीचा श्रोध घेतला असता सदर गुन्हयातील आरोपी हा कळमेश्वर येथील येथील शिवाजी चौक येथे दिसून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्यास नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव **नवी नवाज इस्माईल शहा, वय २१ वर्ष, रा.वार्ड क्र ०१ उपरवाही, ता. कळमेश्वर जि.नागपूर** असे सांगितले त्यास शिवाीजी चौक कळमेश्वर येथून ताब्यात घेवून पो.स्टे चे गुन्हया संबंधाने

विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली गुन्हयात चोरीस गेलेली नवीन टि.व्ही. एस. रायडर मोटर सायकल किमती १,००,०००/— रूपये जप्त करण्यात आली आहे.



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ०३/०९/२०२५ रोजी उमरेड पोलीस पेट्रोलींग करीत पोलीसांना शेन्द्रे क्लीनीक समोर, उमरेड येथेएक संशयीत पिकअप वाहन क्रमांक एम.एच ३२ क्यु ३२५१ मिळुन आल्याने वाहन थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यात गोवंश जनावरे अंत्यत क्रूरतेने व निर्यदयतेने कोणत्याही प्रकारची चारा पाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करत असल्याचे दिसुन आले. चालकाला नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी नामे विजय श्राावण राठोड वय ४५ वर्षे रा. मसाळा ता. उमरेड आणि त्याचा साथीदार अशोक अकुंशराव तांदुळकर, वय ५८ वर्ष रा. दयावानगरी कुभारी रोड उमरेड अशी माहीती समजली. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक पिकअप वाहन क्रमांक एम.एच ३२ क्यु ३२५१ किंमती ४,१०,०००/— रूपये. आणि ४ कालवड, ४ गोरे असे गोवंश जनावरे किंमती ५६,०००/— रूपयाचा एकुण किंमती ४,६६,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.

नमुद दोन्ही आरोपी यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०३/०९/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की **मौजा नांदागोमुख शिवार** येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे.मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता आरोपी नामे १) धनंजय प्रकाश निकोसे,वय २३ वर्ष, रा. रामपुरी ता. सावनेर,२) राहुल शंकर सेबेकर, वय २७ वर्ष, रा. नरसाळा खापा ता. सावनेर, ३) बॉबी गुंडेराव निकोसे वय २३ वर्ष रा. रामपुरी ता. सावनेर,४) प्रविण नामदेव कुभरे, वय ३१ वर्ष, रा. आग्रा ता. नरखेड,५) अभिषेक विजय बुरसे, वय २३ वर्ष, रा. वानाडोगरी ता. हिंगणा ,नागपुर,६) आकाश अशोक

भोयर, वय २७ वर्ष, रा. नांदागोमुख ता. सावनेर,७) रूषीकेश कूष्णा बांबोडे, वय २३ वर्ष ,रा. रामपुरी ता. सावनेर, ८) हर्षल मुरलीधर बल्की, वय २१ वर्ष, रा. नांदागोमुख ता. सावनेर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन ५२ तास पत्ते व रोख रक्कम ९०००/—** रूपये, ०७ मोबाईल आणि ०५ मोटर सायकल असा एकूण ३,०५,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन केळवद येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/वाहतुक तसेच विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, २४ गुन्हे नोंद एकुण ५,२९,५२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०३/०९/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ५,२९,५२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी १) चरणदास विठाबा गायकवाड, रा कृषीमंडी समोर काटोल,२)शुभम उत्तमराव उईके वय २७ वर्ष रा. जवुरवाडा ता. कारंजा जि. वर्धा,आणि एक महीला अरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) गुणवंत शामराव दोडके वय ३७ वर्ष रा वार्ड क्र ११ मोवाड तह नरखेड, २) विजय जानरावजी सरवरे वय २२ वशे रा. अंबाडा देषमुख ता. नरखेड,, ३) श्रावण रामाजी भारसाखरे वय ५५ वशे रा. पिठोरी ता. नरखेड, ४) राहूल सूरेषराव बनाईत वय ३८ वशे रा. खैरगाव ता. नरखेड, ५) मनिश मुन्ना भलावी वय २५ वशे रा. खरसोली ता. नरखेड, यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) सुभाशसिंग जतनस्गिं भोंड वय २४ वर्श रा. आरंभी ता. नरखे, २) उज्वल अषोक सौदागर वय ३१ वर्श रा. वार्ड कं ०३ जलालखेडा ता. नरखेड,आणि एक महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १) गफर अकबर,अंसारी वय ५५ वर्ष रा. खापरी बारोकर,,याचेवर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी नामे १ अक्रम अहमद खा पठान वय ४५ वर्ष रा कारगाव ता भिवापूर जि नागपूर, याचेवर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी नामे १) विकास चित्रषिल पडोळे वय ४० वर्श रा वेलतुर ता कुही,,याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे १.संदिप चंद्रभान पवार वय ३७ वर्ष रा. शेषनगर ता. हिंगणा ह. मु. बावीस मैल फाटा ता. उमरेड,२. आशिष सदगुरू पाल वय ३२ वर्ष रा. भिवापूर उटी ता. उमरेड,यांचे वर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी नामे हरिचंद्र सुखराम नान्हे वय ४१वर्ष रा. डोरली तह पारशिवनी, याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे विकास सोमा उईके वय ६६ वर्ष रा. झिंझेरीसा ता. रामटेक याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे महीला अरोपीवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे विनयकुमार अनिलकुमार सिन्हा वय ३३ वर्षे रा. गांगापुर झोपडपट्टी ता हिंगणा,आणि एक महीला आरोपी यांचेवर गुन्हा

नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे सतपाल जसवंत सिंह वय ५० वर्ष रा. छर्बा ठाना सहसपूर ता विकासनगर जि. देहरादून राज्य उत्तराखंड ह.मू. शेरे पंजाब ढाबा शनि मंदिरचे मागे बुटीबोरी ता. जि. नागपूरख्यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे सेवासींग उर्फ जगतसींग ईदरसींग बावरी वय ७० वर्ष रा महालगाव ता भिवापूर जि नागपूर यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे १) अमित नागोराव गजभिये,वय ३१ वर्षे रा. गोंडेगाव कॉलोनी ता.पारशिवणी, २) दिनेश लिलाधर यादव,वय ३७ वर्षे रा.गवळीपुरा कामठी,यांचेवर गुन्हा नोंद आहे. आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २४ गुन्हे दाखल केले आहे.

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**